

परमपूज्य श्री माताजी श्री निर्मला देवी

श्री माताजींचा मध्य यूरोप दौरा 1989

## इटाली

श्री माताजींच्या यावर्षीच्या यूरोप दौ-याची सुरूवात सर्व जगाचे लक्ष सहजयोगाकडे वेधून घेण्यासाठी सर्व जगाच्या दौ-याच्या घोषणेने झाली. इथे इटालीमध्ये जगाच्या कानाकोप-यातून लोक इतिहासातसुध्दा न वर्णिलेल्या अशा अपूर्व आणि अतुलनीय सोहळ्याप्रित्यर्थ आणि त्याच्या स्मरणोत्सव जमले होते. ही खरोखरच आनंदाची गोष्ट होती की जवळजवळ 35 देशातील सहजयोगी 19 वा सहस्त्रारदिन श्री माताजींच्या उपस्थितीत साजरा करण्यासाठी जमले होते. या अतिशय सुंदर वातावरणात जमलेल्या सर्व बंधु भगिनींबरोबर एकत्र येणे ही खरोखर महत् भाग्याची गोष्ट होती.

सेमिनारची सुरवात प.पू.श्री.माताजींच्या 4 मे रोजी नेपल्स विमानतळावरील आगमनाने झाली. श्री ग्युडो हवामानाविषयी खूप काळजीत दिसत होते. कारण आदल्या दिवशी श्री आदिशक्तीच्या आगमनासाठी पावसाने सा-या शहराला स्वच्छ धुवून काढले होते. परंतू जेव्हा श्री माताजींचे आगमन झाले तेव्हा त्या त्यांच्याबरोबर प्रखर सूर्यप्रकाश आणि हलकी, थंड हवा घेऊन आल्या.

सर्व सहजयोगी लहान मुलांसहित विमानतळावरील प्रेक्षागृहात भजन म्हणत ओळीने उभे होते आणि ते त्यांचा हात एक लाल व सोनेरी रंगाने लिहिलेली पताका घेऊन उभे होते. त्यावर लिहिले होते, "परमपूज्य श्री माताजींचे स्वागत असो. इटालीच्या किना-यावर पुन्हा श्री माताजींना पाहताना सर्वांच्या डोळयात आनंदाचे अश्रू उभे राहिले.

नेपल्सने श्री माताजींना पूर्ण संरक्षण दिले होते. श्री माताजी म्हणाल्या, "ह्या भागामध्ये अगुरूंनी त्यांचा प्रचार न केल्यामुळे येथे सहस्त्रारावर कोणत्याही प्रकारचा ताण जाणवत नाही. त्यामुळे काम अधिकच सोपे झाले आहे".

यापुढे जाण्याअगोदर नेपल्सच्या सुरक्षिततेविषयीच्या एका प्रसंगाचा जरूर उल्लेख करावासा वाटतो. नेपल्सच्या चोरांबद्दल जे बोलल जात अगदी त्या विरुध्द हा प्रसंग आहे. {ते तुमचे पायमोजे आणि बूट तुमच्या नकळत पळवण्याबद्दल प्रसिध्द आहेत} महामार्गावर आम्ही आमची गाडी जोरात सुरू केली. कार हरवण्याच्या भितीने आम्ही लवकर पुढे जात होतो. आणि आम्हाला चेंज मिळविण्याची इच्छा नव्हती. तेवढयात एका पोलिसाने मागून येऊन आम्हाला गाठले आणि गाडी थांबवली. आम्हाला आश्चर्य वाटले की आम्ही कोणता गुन्हा केला आहे. पण त्याने फक्त आमची चेंज आम्हाला परत केली, आमचे आभार मानले आणि तो निघून गेला.

सोरेन्टोच्या कँपवर समुद्रकिनारी एका टेकडीवर उभ्या केलेल्या तंबूंना पाहून आम्हाला गणपतीपुळ्याची आठवण झाली. तेथिल शांत वातावरणाने आम्ही आश्चर्यचकित झालो. चार तारखेच्या रात्री बरच काही करायचे असल्यामुळे श्री माताजींनी त्या रात्री अजिबात विश्रांती घेतली नाही. पूजेचे सर्वांना जास्तीत जास्त फायदे व्हावेत म्हणून सहस्त्रार उघडे कसे राहिल, यावर त्या थोडीशी विश्रांती न घेता काम करीत होत्या.

शुक्रवारी 5 मे रोजी कॅप्री याबरोबर बोटीने प्रवास करण्याचे ठरले. ती अतिशय प्रखर आणि सुंदर सकाळ होती. कॅप्रीला जाताना श्री माताजी सहजयोग्यांबरोबर येणार आहेत असे समजताच, सर्वांना अतिशय आनंद झाला. ती मोठी बोट सर्व सहजयोग्यांनी आणि श्री माताजी यांच्यासहित पूर्णपणे भरुन गेली होती. श्री माताजी आमच्याशी अगदी थोडक्यात बोलल्या. त्या म्हणाल्या की, तुमचे अगदी छोटे प्रश्न माझ्याकडे घेऊन येता हे तुमच्या प्रगतीचे लक्षण नाही. आपण आपल्या वैयक्तिक प्रश्नांमधून वर येऊन जे सामुहिकतेचे प्रश्न आहेत, ते सोडविण्यासाठी मदत केली पाहिजे. {तुम्ही सहजयोगासाठी उपयुक्त न असता उपयुक्तच असले पाहिजे} तुम्ही सहजयोगासाठी भार किंवा ओझे न रहाता तुम्ही सहजयोगाची मालमत्ताच असले पाहिजे. ज्यांचे वैयक्तिक, आर्थिक, भावनिक किंवा इतर प्रकारचे प्रश्न असतील अशांना सामुहिकतेपासून दूर ठेवले पाहिजे, जोपर्यंत त्यांचे प्रश्न पूर्णपणे सुटत नाहीत तोपर्यंत त्या म्हणाल्या, "समजा तुम्ही जहाजावर आहात आणि तुम्हाला कात्री हवी आहे. पण तुम्हाला ती सापडत नाही म्हणून, त्याबद्दल तुम्ही काळजी करीत बसता. पण जर जहाजावर कात्रीच नसेल, तर तिला शोधून तुम्ही प्रश्न का निर्माण करता ?"

कॅप्री बेटावर उतरत असताना श्री माताजींनी 2 मोठे प्रसिध्द खडक समुद्रातून वर आलेले पाहिले. त्यापैकी एक कमानीकृती होता. याबद्दल श्री माताजी म्हणाल्या की, "अशाप्रकारे झेन मास्टर्स निसर्गाच्या सहाय्याने आपल्या साधकांना निर्विचार स्थितीला नेण्यासाठी मार्गदर्शन करीत असत. {येथिल असामान्य गोष्ट म्हणजे समुद्राच्या त्या मध्यभागात समुद्र हा खूप गडद रंगाचा आहे} बोटीत बसल्यावर आणि ह्या सुंदर दृष्याचा आनंद घेतल्यावर आम्हाला कल्पना नसतानासुध्दा एक बॅटरीवर चालणारी सामानवाहू गाडी श्री माताजींसाठी मिळाली. त्यानंतर आम्हाला केबल कार मिळाली, की ज्यायोगे जहाज सुटण्याअगोदर आम्ही वेळेवर पोहोचलो. ह्या दुर्मिळ अशा वहातुकीच्या साधनामुळे सहजपणेच नाचत आणि गात एक छोटीशी मिरवणूक निघाली. हे खरोखरच आश्चर्यचि

आहे की, आपल्या इच्छापूर्तीसाठी श्री माताजी सर्वकाही स्वीकारतात आणि त्यासाठी साधन आणि बहाने निर्माण करतात.

एका सहजयोग्यांनी प्रवासात श्री माताजींचे फोटो घेतले आणि कॅम्पमध्ये ते डेव्हलप केले आणि श्री माताजींना दिले. श्री माताजींचे खरे स्वरूप दर्शविणारे चमत्कारिक फोटो कॅमेराने टिपले होते. टप्प्याटप्प्याने आपण ते फोटो पाहू शकतो. पहिल्या फोटोमध्ये आम्ही सर्वजण श्री माताजींच्या भोवती बसून भजने गात आहोत असे दिसले. दुस-या फोटोत सर्वकाही पुसटसे दिसत होते. तिस-या फोटोत आपण पाहू शकाल की श्री माताजींमधून तीन शक्त्या प्रगट झालेल्या दिसत होत्या. महालक्ष्मी, महासरस्वती, महाकाली. चौथ्या फोटोतही श्री महालक्ष्मीची शक्ती श्री माताजींच्या आज्ञा चक्रातून वर जाऊन सहस्त्रार उघडून गेलेली दिसत होती. आणि त्याभोवती विविध रंगाचे प्रकाश पसरलेले दिसत होते. तो खरोखरच अद्वितीय फोटो होता.

पाच तारखेच्या रात्री सारेन्टो येथे एका हॉलमध्ये, तेथिल महापौरांनी श्री माताजी आणि सहजयोग्यांसाठी सांस्कृतिक गायन व नृत्याचा कार्यक्रम आयोजित केला होता. आणि सोरेन्टोच्या तर्फे श्री माताजींना त्यांनी भेटवस्तू दिल्या. पारंपारिक पध्दतीच्या नृत्याच्या व गायनाच्या जोरदार कार्यक्रमानंतर व्यासपीठ स्विर्झलंडच्या श्री जोझे यांच्यासाठी मोकळे करण्यात आले. त्यांनी काही माहितीच्या सहजयोग्यांच्या नकला केल्या आणि सर्वांना हसून सोडले.

सहा तारखेला सकाळी श्री माताजींनी 18 फूटावरून जमिनीवर पडलेल्या एका लहान मुलाला वाचविले. नंतर त्या सर्व लिडर्सना भेटल्या व येणा-या संपूर्ण युरोप दौ-याचा कार्यक्रम आखला. जेव्हा त्यांचे पूजेला आगमन झाले तेव्हा अमावस्येचा काळ संपला होता, त्यामुळे पूजेला सुरूवात करता आली. स्टेज अतिशय सुंदररीतीने सजविले होते. श्री माताजींच्या सिंहासनावरच्या बाजूला श्रीचक्र केले होते. त्याची 7 टोके ही बेल आणि फुले लावून जमिनीवर सोडली होती. मागील पडदयावर सहजयोगी कलाकारांनी श्री विराटांच्या उत्क्रांत स्थितीचे चित्रण रेखाटले होते.

रात्री जवळजवळ फक्त 2 तासांची विश्रांती मिळूनसुध्दा श्री माताजी अगदी आनंदी आणि उत्साही दिसत होत्या. पूजा नेहमीप्रमाणे सुरू झाली. परंतू मधेच श्री माताजींनी आम्हाला गाणे थांबवायला सांगितले आणि आम्हाला आमचा एक हात हृदयावर ठेवून गायला सांगितले. साक्षात आदिशक्तीसमोर गाण्याचा हा किती महत्भाग्याचा क्षण आहे, अशा भावनेने तुम्ही गा, असे त्या म्हणाल्या यामुळे खरोखरीच खूप फरक पडला. पूजा चालू असताना फोटो काढून आपले चित्त विचलित करू नये असे त्या म्हणाल्या. जरी श्री माताजी काय सांगत आहेत हे आपल्याला समजत नसले, तरीसुध्दा आपण श्री माताजींना आतून जाणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. श्री माताजी काय सांगत

आहेत, याबद्दल माहित करून घेणे हे तेव्हा आवश्यक नसते. परंतु जेव्हा त्या भाषणाच्या प्रीत निघतील तेव्हा तुम्ही त्याची टेप ऐकू शकता. सर्व पूजा आणि गाणी इतकी खोल सुंदर आणि संक्षिप्त होती की ते आम्हाला निर्विचारितेच्या दुसऱ्या जगात आणि शांततेच्या सागरात घेऊन गेले, जो आनंद अमर्याद आहे. प्रत्येक लाट आम्हाला जागृतीच्या उच्च स्थितीला घेऊन जात होती.

तेथे उपस्थित असलेले सर्व सहजयोगी श्री माताजींच्या चैतन्यलहरी पेलू शकत होते. त्यामुळे श्री माताजी खूप प्रसन्न होत्या. पूजेनंतर ज्या पुरूषांनी सहजयोग पसरविण्यासाठी काम केली होती, त्या सर्वांना श्री माताजींनी रेशमी कुडते आणि शर्ट आणि स्त्रीयांना रेशमी साडया आणि शाली भेट दिल्या.

रविवार 7 मे रोजी शहराच्या सर्व प्रसिध्द दुकानांवर आणि रस्त्याच्या कडेला पोस्टर्स लावलेली आम्ही पाहिली. संध्याकाळच्या कार्यक्रमाला सोरन्टोतील सर्व शोधक उपस्थित होते आणि त्यांनी हा कार्यक्रम अतिशय सुंदरपणे स्विकारला. त्यांच्यामध्ये काही डॉक्टर्स, शास्त्रज्ञ, आर्किटेक्टस् होते आणि त्या सर्वांना जागृती झाली. जोपर्यंत श्री माताजी आलेल्या प्रत्येक शोधकाला भेटत होत्या आणि त्यांचे प्रश्न सोडवत होत्या तापर्यंत इकडे सर्वजण भजन गात होते आणि हॉलमध्ये आनंदाने नृत्य करीत होते. प्रत्येक उत्साही शोधक हा जागृतीचा अनुभव घेण्यासाठी उत्सुक होता आणि त्याप्रमाणेच प्रश्न विचारले गेले. जेव्हा शेवटच्या शोधकाला त्याची जागृती मिळाली तेव्हा सोरेन्टोसारख्या अतिशय सुंदर गावात भरलेल्या ऐतिहासिक संमेलनाच्या प्रित्यर्थ फटाके वाजविण्यात आले.

सोमवार 8 मे रोजी नेपल्सला जात असताना पॉम्पेली हे ठिकाण पहाण्यासाठी श्री माताजी थोडावेळ थांबल्या. व्हेसुवियसच्या खाली असलेल्या ह्या छोटयाशा गावाचा एका रात्रीत विध्वंस झालेला होता. तेथे दगडविटांचे तुकडे आणि राख दिसत होती. श्री माताजींनी सांगितले की ते एकादश रूद्राचे प्रतिसाद आहेत. कारण ते त्या जागेतील लोकांचा जो अहंकार बळावत चाललेला आहे तोच तपासून पहात होते. त्यानंतर श्री माताजी टेरे डेल ग्रेको ह्या गावात थोडयावेळ थांबल्या. तेथिल अतिशय सुंदर आणि स्वस्त पोवळ्यासारखे लाल दगड जगप्रसिध्द आहेत.

नेपल्सच्या कार्यक्रमातील गर्दी पाहून असे दिसून येते की 1988 सालातील श्री माताजींच्या भेटीचा लाभांश भेटीचा लाभांश यावर्षी मिळत आहे. त्या भव्य सभागृहातील वास्तुकला खरोखरच अद्वितीय होती. मुरॅनो काचेची मोठी झुंबरे, सव भिंतीवरील कोरिव काम यामुळे कार्यक्रमासाठी सुंदर रंगमंच तयार झाला होता. श्री माताजींचे आगमन होताच टेलिव्हिजनचे लोक मुलाखत घेण्यासाठी उत्सुक होते. प्रश्न अचूक विचारले गेले आणि जेव्हा नेपॉलिटियन लोकांबद्दल विचारले गेले तेव्हा श्री माताजी म्हणाल्या की, "ते खूप चांगले आणि मोकळ्या मनाचे आहेत. आपल्या

आईबद्दल त्यांना असीम प्रेम आणि आदर आहे. सभागृहाच्या प्रवेशद्वाराजवळ एक स्त्री उभी होती आणि तिला चक्कर येत होती. श्री माताजींनी तिच्या कुंडलिनीवर काही मिनिटे काम केल आणि ती बरी झाली. तिला पूर्वीपेक्षा खूपच बरे वाटले. तो मोठा हॉल असूनही पूर्णपणे भरला होता. आणि सर्वांना सामुहिकतेत जागृती मिळाली. आपल्याला मिळालेली जागृती प्रस्थापित करण्यासाठी, त्यांच्यापैकी 100 लोक 7 आठवडयाच्या उपक्रमात सहभागी झाले.

कार्यक्रमानंतर पहाटे 3 वाजता श्री माताजी रोममधील "निर्मला हाऊस" मध्ये विश्रांतीसाठी गेल्या.

<u>रोम</u> :-

9 आणि 10 तारखेच्या री माताजींच्या पब्लिक प्रोग्रॅमसाठी रोमच्या मध्यभागातील व रेल्वे स्टेशन जवळील एक हॉल घेतला होता. इथेसुध्दा पुष्कळ लोक आले. आणि त्यांना आत्म-साक्षात्कार मिळाला. एका स्त्रीला लिव्हरचा कॅन्सरचा त्रास होता. ती दोन दिवस कार्यक्रमाला उपस्थित राहिली. श्री माताजींना भेटली आणि तिला तिची जागृती मिळाली. त्यामुळे ती जवळजवळ बरी झाली. श्री माताजी तेथिल सर्व लोकांशी अगदी अस्खलितपणे आणि संपूर्ण प्रेमाने बोलल्या की ज्यामुळे सर्व लोकांनी सहजपणे सहजयोग स्विकारला आणि पुढील कार्यक्रमांना नियमितपणे उपस्थित राहयाचे आश्वासन दिले. रोममध्ये आठवडयातील प्रत्येक दिवशी असे कार्यक्रम दोन महिने चालणार आहेत. ﴾ फॉलो अप प्रोग्रॅम ﴿

रोमच्या जवळच "मंगला हाऊस" नावाचा अजून एक आश्रम आहे. तेथे 5 वर्षाच्या आतील 16 मुले राहतात. त्यांना भेटून आम्हाला खूप आनंद झाला. ते चैतन्यलहरी आणि चक्रे ह्यांच्या माहितीमध्ये प्रविण आहेत. ते अतिशय हुशार, तत्पर आणि प्रेमळ आहेत. 11 तारखेला संध्याकाळी त्यांनी श्री माताजींसमोर ﴾चार्ली चक्रावर﴿ बसविलेले एक सुंदर नाटक सादर केले आणि त्यानंतर सहजयोगातील काही गाण्यांवर नृत्य केले.

रात्रीच्या जेवणासाठी अक्बर ह्यांनी आश्रमातील एका मोठया क्रिचनमध्ये सर्व सहजयोग्यां-साठी चविष्ठ पिझ्झा केले होते. त्यानंतर श्री माताजी मुलांना कसे संभाळले पाहिजे, सहजयोग कसा पसरविला पाहिजे आणि नवीन लोकांकडे कसे लक्ष दिले पाहिजे, ह्याविषयी सर्व सहजयोग्यांशी बोलल्या. त्यांनी सांगितले की, नविन लोकांना आपण सांगितले पाहिजे की परमेश्वराच्या राज्यात फार थोडी जागा आहे आणि ती लवकर भरत आहे. त्यामुळे सहजयोगात येण्यासाठी त्यांनी घाई केली पाहिजे.

स्पेन :-

18 मे ला 3 वाजता आयबेरिया या स्पॅनीश एअरलाइन्सने, इंग्लंडहून श्री माताजींचे आगमन झाले. माद्रीद आणि झारागोझा येथील सर्व सहजयोग्यांनी श्री माताजींचे हार्दीक स्वागत केले. इंग्लंडच्या थंड हवेतून आल्यावर 33 अंश सेंटीग्रेडइतके उष्ण तपमान असलेल्या स्पेनमध्ये आम्ही आलो होतो. श्री माताजींनी तावडतोब उजवी बाजू उतरविली आणि थोड्याच वेळात थंड हवा वाहू लागली आणि निळ्या आकाशात ढग जमू लागले.

एका हॉटेलच्या हॉलमध्ये कार्यक्रम आयोजित केला होता. शहरात जात असताना आम्ही, जेथे कार्यक्रम होता त्या ठिकाणापासून निघालेली 2 इंद्रधनुष्य पाहिली. शहरातील सर्व प्रमुख ठिकाणी श्री माताजींचे पोस्टर्स लावलेले दिसत होते. जर कायदेशीररित्या पोस्टर्स लावायला परवानगी असेल तर तुम्ही त्यावर केंद्राचा पत्ता लिहा. असे श्री माताजींनी सुचविले. त्यावर असेही लिहायला हरकत नाही की जर त्यावरील फोटोकडे हात करुन उभे राहीलात तर तुमच्या हातातून गार वारा वाहू लागेल. अशाप्रकारे त्याच्या जवळून येणा-या जाणा-या वाटसरुंना जरी श्री माताजी तेथे नसल्या तरी जागृती मिळेल आणि ते केंद्रावर येऊ शकतील.

श्री माताजींचे जेव्हा आगमन झाले तेव्हा हॉल पूर्णपणे भरला होता. जमिनीवर आणि सर्व बाजूने लोक बसले होते. आलेले सर्व लोक ज्ञानी आणि सभ्य होते. त्यांनी योग्य प्रश्न विचारले. भाषणानंतर प्रत्येकाला वैयक्तिकपणे भेटताना आणि आशिर्वादीत करताना श्री माताजींना खुप आनंद होत होता. अगुरुंमुळे त्रास झालेले पुष्कळसे शोधक आले होते. परंतू नंतर त्यांना जागृती देण्यात आली. त्यांच्या काही पोलिओ आणि स्पॉन्डीलिसिस झालेले रोगी होते आणि ते बरे झाले. काहीजण भूतबाधेविषयी तक्रार घेऊन आले होते. पण तेही बरे झाले. जेव्हा कार्यक्रम संपला होता तेव्हा मध्य रात्र उलटून गेली होती. परंतू एवढया नवीन लोकांना पाहून सहजयोगी खुप आनंदात होते. त्यांनी पुढील आठवडयातील केंद्रावर उपस्थित राहण्याचे आश्वासन दिले.

दुस-या दिवशी सकाळी विमानाने बार्सिलोनाला जाण्यासाठी श्री माताजी निघाल्या. तेथे जवळजवळ 200 सहजयोगी पुष्पगुच्छ घेऊन श्री माताजींचे स्वागत करण्यासाठी विमानतळावर आले होते. त्यानंतर थोडीही विश्रांती न घेता पब्लिक प्रोग्रॅम घेण्यासाठी श्री माताजी निघाल्या. हॉल ब-यापैकी भरला होता आणि पुष्कळ लोकांना जागृती मिळाली. अगुरुंमुळे काही शोधकांचे खरोखरच खुप नुकसान झाले होते. एक माणूस योगानंदांचा शिष्य होता आणि त्याला सहस्त्राराचा कॅन्सर झाला होता. त्याला जागृती आली आणि आता तो थोडाथोडा बरा होत आहे. त्यांच्यापैकी बरेचजण

सिध्दयोगातून, बालयोगींकडून आणि काहीजण रजनीशकडून आलेले होते. त्या सर्वांना जागृती मिळाली. त्यांच्या चक्रावर इतका धक्का बसूनसुध्दा आणि त्यांच्याकडून पवढया चुका होऊन सुध्दा श्री माताजींनी त्यांच्या बाधा ओढून घेतल्या आणि त्यांना जागृती देऊन त्यांना क्षमा केली. श्री माताजींचे प्रेम खरोखरच अगाध आहे.

फक्त अडीच तासांची विश्रांती घेऊन सकाळी लवकरच श्री माताजी श्री बुध्द पुजेसाठी निघाल्या. ग्रामीण भागातील हिरव्यागार टेकडयांचे ते मंत्रमुग्ध करणारे ते दृष्य होते. बार्सिलोनाच्या हया एका सुंदर भागात इतक्या संख्येने झालेल्या प्रवाशांना पाहून एखादयाला शंका येणे साहजिकच आहे. श्री माताजींना वाटले की जणू काही सारा निसर्गच श्री माताजींचे स्वागत करण्यासाठी त्याठिकाणी नम्रपणे उभा आहे. तेथेच एका टोकाला "अेल फॅरेल" नावाचे हॉटेल होते आणि तेथेच सर्व सहज-योग्यांची 2 रात्र राहाण्याची सोय केली होती. द-यांची तमा न बाळगता एका मोकळया जागेतच पूजा आयोजित केली होती. टेकडीच्या दुस-या बाजूचे दृष्य हे नाशिकजवळ असलेल्या वणीच्या सप्तशृंगी-च्या देवळाप्रमाणे होते. गणपतीपुळयाच्या मातीसारखाच तिथल्या मातीचा रंग होता.

स्पेनमध्ये बुध्द पूजा होणे ही खरोखरीच भाग्याची गोष्ट होती. पब्लीक प्रोग्रॅममध्ये हे स्पष्ट दिसत होते की जे स्पॅनीश शोधक प्रोग्रॅमला आले होते. त्या सर्वांना आज्ञा चक्राचा त्रास होतो कारण क्षमा करणे ही गोष्ट त्यांना अवघड जात होती. सॅन डी एगो मध्ये केल्या प्रमाणे श्री ग्रेगवायर हयांनी जसजसे मंत्र म्हणायला सुरवात केली तेव्हा त्यांच्या लक्षात आले की काही पाने हरविली आहेत. त्यामुळे त्यांना ते सहजतेतच घ्यावे लागले. आ णि ते जास्त प्रभावी ठरले.

श्री माताजींनी अस्खलितपणे आणि संपूर्ण विनोदी त-हेने भाषण केले. अतिशय सुंदर रितीने त्यांनी बुध्दांच्या जीवनाचा अर्थ स्पष्ट केला आणि आपला त्याच्याशी काय संबंध आहे हे ही सांगितले. "बुध्दांचे हसरे व्यक्तिमत्व" असा श्री माताजींनी स्वतःवर उल्लेख केला. हया पुजेतून सर्व सहजयोग्यांना श्री माताजींनी असा संदेश दिला की, "त्यांनी आपल्या अहंकारापासून दूर राहिले पाहिजे. आणि अहंकार हा सर्वांवर आणि श्री माताजींवर कसा हल्ला करतो, हे सांगितले. सर्वांना तो अहंकार दिसत असतो, पण ज्या व्यक्तिला तो झाला आहे त्याला ते समजत नसते. लोक आपल्याला ब-याचवेळा विचारतात की आमच्यात अहंकार का निर्माण होतो. त्या म्हणाल्या की याबद्दल तुम्ही श्री माताजींना दोषी ठरवू नये. कारण त्यांनी आपल्याला जागृती दिली आहे. आणि आपले हे कर्तव्य आहे की आपण ते संभाळले पाहिजे, की ज्यायोगे आपण त्याच्यात {अहंकारात} सापडणार नाही. किंवा मग त्याच्याकडे {अहंकाराकडे} दुर्लक्ष करा आणि त्याला तोंड द्या. त्या म्हणाल्या की, "तुम्ही स्वतःशी प्रामाणिक रहा. सत्य हीच आपली शक्ती आहे आणि आपण आपल्या जागृती-

बद्दल कधीही लाज बाळगू नये". पूजेमध्ये त्यांनी सांगितले की देवलोकाप्रमाणे आज येथे सर्व देवदेवता आल्या आहेत अणि प्रस्थापित झाल्या आहेत. त्या म्हणाल्या कदाचित कॅमेरा हे बरोबर टिपून घेईल.

पूजेनंतर तेथे आलेल्या सर्व देशांच्या लीडर्सनी श्री माताजीसाठी सुंदर भेटवस्तू आणल्या होत्या. स्पॅनिश सहजयोग्यांनी एक मोठे पेंटिंग श्री माताजींना भेट दिले. त्या ग्रेको पेंटिंगवर पवित्र मेरीचे चित्र रेखाटले होते. ते चित्र खरोखरीच हृदयस्पर्शी आणि सुंदर होते. आणि ते पाहून श्री माताजींच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. ते अतिशय हृदयस्पर्शी होते. श्री माताजींनी ते पेंटिंग माद्रीद येथिल प्रावो या ठिकाणी मागच्यावर्षी पाहिले होते आणि त्यांना खूपच आवडले होते.त्या म्हणाल्या "त्यांच्या सर्वांच्या कुंडलिनीकडे पहा." कारण सर्व संतांच्या मस्तकाभोवती छोट्या ज्योती रंगविलेल्या असतात.

पुजेनंतर श्री माताजींनी थोडावेळ विश्रांती घेतली आणि नंतर त्या बाहेर आल्या. आणि सहजयोग्यांसमवेत बसल्या. आणि त्यांच्याशी सहजयोगात घडलेल्या अनेक चमत्कारांविषयी त्या बोलल्या की जे फिल वॉर्ड यांना उपयोगी ठरले.

संध्याकाळच्या कार्यक्रमामध्ये दुस-या ठिकाणी आधीच्या दिवसापेक्षा दुप्पट लोक आले होते. ही आश्चर्याची गोष्ट होती की किती उत्साहाने तेथील लोकांनी, जोझे आणि मंडळी यांनी सादर केलेल्या भारतीय गाण्यांना दाद दिली. सर्वजण समुहाने ती गाणी म्हणत होते. आणि तालावर डुलत होते. बर्सिलोना येथिल भारतीय आपल्या कानांवर विश्वास ठेवू शकत नव्हते की परदेशी लोक स्पष्टपणे हिंदी, मराठी आणि संस्कृत बोलू शकतात. श्री माताजी प्रत्येकाशी वैयक्तिकपणे भेटल्या आणि सर्वांना जागृती दिली. कित्येक जणांना ती सुंदर गाणी ऐकूनच अगोदरच त्यांना जागृती मिळाली होती. श्री माताजींना प्रत्येक चक्रावर कार्य करण्यास अजिबात लागले नाही त्यांनी फक्त आपले हात श्री माताजींपुढे केले व आपल्याला ते जाणवल्याची खात्री करून घेतली.

## अथेन्स

25 तारखेला लंडनच्या हिथ्रो विमानतळावरून विमान सुटायला थोडा उशीर झाला. अथेन्सला पोहोचल्यानंतर आमच्या हे लक्षात आले की श्री माताजींच्या आगमनासाठी तेथील सहजयोग्यांना थोडा वेळ हवा होता आणि श्री माताजींच्या ह्या भेटीसाठी एकत्र येऊन काही महत्वाच्या गोष्टी ठरवायच्या होत्या म्हणून ते तसे झाले. इकडे श्री माताजींना त्यांच्या जीवनावर आणि कार्यावर जो चित्रपट निघत आहे त्याविषयी श्री निक ग्रॅनबी यांच्याशी थोडक्यात बातचीत करावयाची होती.

जात असताना श्री माताजींनी ग्रीसचे हवामान ठीक केले. आणि त्यांचे आगमन होताच सहजयोग्यांनी श्री माताजींना सांगितले की आश्चर्याची बाब म्हणजे तापमान 10 सेल्सियस वर आले

सहजयोग्यांनी श्री माताजींना सांगितले की आश्चर्याची बाब म्हणजे तापमान 10 सेल्सियस वर आले आहे. तसेच मोसम नसतानासुद्धा थोडा पाऊस पडला. श्री माताजींचे विमानतळावर भव्य स्वागत झाले. जरी श्री माताजी ग्रीसला प्रथमच जात असल्या तरीही सर्व देशांचे प्रतिनीधी इश्वरी कार्यात मदतीचा हात देण्यासाठी धावत आहे ग्रीक रहिवाशांचे मुक्तिसाठी प्रेम हे खरोखरीच हृदयस्पर्शी होते. श्री गयुडो यांनी रोमवरुन त्यांची मर्सिडीस श्री माताजींसाठी आणली होती.

श्री माताजींचे आगमन होताच ग्रीक लीडर स्टॅमॅटिस यांच्या घरी एका वयस्कर गृहस्थांनी श्री माताजींची रेडीओसाठी मुलाखत आयोजित केली होती. मुलाखत घेत असतानांच त्यांना जागृती मिळाली. त्यांनी श्री माताजीबद्दल आपली पूर्ण नम्रता व आदर व्यक्त केला. आणि श्री माताजींना ह्या महान कार्याबद्दल पाठींबा व्यक्त केला.

श्री माताजींना त्यांच्या घरुन असा फोन आला की लंडनमध्ये पाण्याचा मोठा तुटवडा आहे. श्री माताजींनी लगेच त्यांना बंधन दिले आणि दुस-या दिवशी आम्ही बातमी वाचली की लंडनच्या उत्तर भागात प्रश्न सोडवण्यापुरता पुरेसे पाणी टाक्यांमध्ये जमा झाले.

24 मे रोजी श्री अथेना पूजा झाली. अथेना म्हणजे "पवित्र आत्मा" {होली घोस्ट} "अथ" म्हणजे आदी आणि ॲना म्हणजे माता प्रत्यक्षात पूजा सकाळीच ठरली होती. परंतु चांदण्यारात्री खूप उशीरापर्यंत कार्यक्रम झाल्यामुळे पूजा दुस-या दिवशी खूप उशीरा सुरु झाली. तोवर पुजेची तयारी व्हायची होती. श्री माताजींनी सांगितले की पूजा ही दुपार व्हायच्या आत झाली पाहीजे पण त्या नंतर करु नये कारण दुपारी 12 ते 4 ही वेळ सर्व देवतांची विश्रांतीची वेळ असते. त्यामुळे पूजा संध्याकाळी 4 वाजता चालू झाली.

पूजेमधे श्री माताजींना श्री अथेनांबद्दल विस्तृतपणे सांगितले आणि ग्रीसचे आत्मिक कार्य याबद्दल सांगितले {पुढील अकांत याबद्दल लिहले आहे}

भाषणानंतर श्री माताजींना एक ढाल भेट देण्यात आली. त्यावर सापांचे चित्र होते आणि त्याला भाले जोडण्यात आले होते. हेल्मेटसारखा लाल तुरा असलेला एक मुकुट भेट देण्यात आला. त्यावर 3 सूक्ष्म मार्ग {चॅनेल} दिसत होते. कुंडलीनी दाखविणारे छातीवरचे सोनेरी रंगाचे पोलादी कवच श्री माताजींना देण्यात आले.

फिल वॉर्ड यांनी सॉक्रेटीस यांच्या "क्षमेची प्रार्थना" यातील काही उतारे वाचले. त्यानंतर स्टॅमॅटीस यांनी प्राचीन ग्रंथातून श्री अथेना यांची जी 108 नावे शोधली होती ती त्यांच्या अर्थासहीत पूजेत वाचली. हे मंत्रपठन चालू असताना खूप जोरात चैतन्यलहरी वाहत होत्या. नेहमीप्रमाणे

दुस-या दिवशी इस्तंबुलाला जाण्यासाठी सकाळी लवकरच आम्हाला विमान गाठायचे होते. पुन्हा एक चमत्कार घडला. ज्या विमानाने श्रीमाताजी जाणार होत्या त्याच विमानाने वीस सहजयोग्यांना जाण्याची इच्छा होती. परंतू विमान अगोदरच पूर्णपणे भरले होते. त्यानंतर 7 जणांना परवानगी मिळाली. स्टॅमॅटीस यांनी श्रीमाताजींना आम्हाला मदत करण्यासाठी प्रार्थना केली. श्रीमाताजींनी त्याला बंधन घातले आणि जे 12 लोक होते की ज्यांचे बुकींग व सामानाची तपासणी अगोदरच झाली होती. त्यांना अचानक न जाण्याचे ठरविल्यामुळे सहजयोग्यांना त्या विमानाने जाता आले. विमानाला निघण्यास उशीर होता त्यावेळात श्री माताजींनी ग्रीकचे प्रतीक आठवण म्हणून काही वस्तू खरेदी केल्या.

तुर्की

इस्तंबुलमध्ये इटालीच्या श्रीमती काली मेरिनो हया आमच्या सर्व काळजी घेणा-या होत्या. ग्युडो आणि अकबर यांच्या मदतीने, त्यांनी एकटयांनी श्रीमाताजींच्या भेटीचा सर्व कार्यक्रम आयोजीत केला होता. सर्व व्यवस्था नीट झाली आहे की नाही हे पाहण्यासाठी ते दोघे जण तेथे अगोदरच पोहोचले होते.

मशिदी आणि त्यांचे मनोरे असलेले आशिया पध्दतीने शहर युरोपमध्ये पाहून खरोखरच आश्चर्य वाटते. त्या शहरात झालेला बदल तिथे झालेली प्रगती व तेथिल स्वच्छता पाहून श्रीमाताजींनी तुर्की लोकांबद्दल असे मत व्यक्त केले की मागे त्या लोकांना त्यांच्या धर्माने अगुरूंच्या मागे न जाण्याचे संरक्षण दिले होते.

फुले खूप मोठी आणि सुवासिक होती. पुन्हा एकदा हवामानाने सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला. श्री माताजींच्या भेटीमुळे पावसानंतर सर्व काही गार झाले. बॉस्फूरसच्या किना-यावरच श्रीमती काली यांचे घर होते. तेथूनच येणारी, जाणारी जहाजे एकाचवेळी 12 ते 14 मासे पकडणारे ओळीने उभे राहिलेले मच्छीमार आम्ही पाहू शकत होतो.

दुपारी इस्तंबुलच्या मध्यभागात असणा-या जुन्या बाजाराला श्री माताजींनी भेट दिली. तेथिल चांदीवरील कलाकुसरीचा दर्जा खरोखरच खूप असामान्य होता. श्री माताजींनी तेथे काही वस्तु खरेदी केल्या. तेथे असलेल्या युरोपियन लीडर्सनी पूजेसाठी चांदीचे किनार आणि दांडा असलेला सुंदर आरसा खरेदी केला.

पाकीस्तानच्या बेनझीर भुट्टो भेट देण्यासाठी येणार होत्या. त्यामुळे रस्त्यावर खूप गर्दी झाली होती. गाडी लावण्यासाठी जागा नसल्यामुळे ग्युडो यांनी रस्त्याच्या कडेला गाडी लावली. लोकांनी आरडाओरडा सुरू केला. त्यांनी लगेच वळून आणि स्मित करून त्यांना सांगितले कि,

पंचतत्व श्रीमाताजींच्या हातावर न घालता चरणांवर वाहिल्यामुळे श्री माताजींनी खरोखरीच "चरणामृत" तयार केले आणि त्यावेळी चैतन्यलहरी खरोखरीच सुंदर होत्या. आंतरराष्ट्रीय सामुहिकतेच्या तर्फे श्री माताजींना पारंपारीक ग्रीक पद्धतीचे सोन्याचे पॉलिश असणारे नेकलेस, ब्रेसलेट व अंगठी भेट देण्यात आली. ग्रीक सहजयोग्यांनी बाहेरच्या देशातून पुजेस आलेल्या सर्व सहजयोग्यांना घरी नेण्यासाठी एक ऑलिव्ह झाडाचे रोपटे भेट दिले.

त्याच दिवशी संध्याकाळी हॉटेल ग्रँड ब्रिटेन मधे पब्लिक प्रोग्राम आयोजित केला होता. आणि सत्याला शोधण्या-या 700 शोधकांनी हॉल पूर्ण भरला होता. ग्रीसच्या महान संस्कृती वारस्याबद्दल त्यांनी सांगितले. ग्रीक लोकांना सुरवातीपासूनच माकडहाड, कुंडलीनी (सर्पाची शक्ती) तिचे चेटोळे यांची माहीती आहे. श्री माताजी म्हणाल्या की त्यांना सुख समृध्दीचे वरदान होते. (उदा. मोठे जहाज उद्योगी) परंतू ते नंतर नष्ट झाले. चालले नाही, कारण त्यांनी आपले आत्मतत्व टिकवले नाही.

कार्यक्रमात आलेल्या ब-याच लोकांना जागृती मिळाली. दुस-या दिवशीही कार्यक्रमास येण्याचे त्यांनी आश्वासन दिले. श्री माताजी प्रत्येकास वैयक्तिक भेटल्यानंतर रात्री 1 वाजता कार्यक्रम संपला. त्यानंतर आम्ही रात्रीचे जेवण करण्यासाठी एका हॉटेलमध्ये गेलो, तिथे आम्ही पारंपारिक ग्रीक पध्दतीचे जेवण घेतले आणि बोझोन्किल आणि ग्रीक लोकगीते ऐकली. त्यानंतर सहजयोग्यांनी स्टेशनवर जाऊन गाणी म्हटली. पहाटेचे 4 वाजले तरी श्री माताजी विश्रांतीसाठी गेलेल्या नव्हत्या.

दुस-या दिवशी संध्याकाळी आम्ही पाहिले की काही वर्तमानपत्रात आदल्या दिवशीच्या कार्यक्रमाबद्दल काहीतरी निरर्थक छापले होते. तरीसुध्दा त्या हॉटेलच्या क्षमतेपेक्षा म्हणजे 750 लोक आधीच उपस्थित होते. हॉटेलच्या अधिका-यांना आणखी लोकांना प्रवेश देणे म्हणजे संकटच वाटावयास लागले होते. ज्या 75 लोकांनी श्री माताजींना आदल्या दिवशी पाहीले नव्हते अशा लोकांनी आत गोंगाट करून प्रवेश मिळवला. आणि व्यवस्थापकांना ते स्वीकारावे लागले. हे सर्वजण स्टेजच्या आजूबाजूला व पाय-यांवर बसले होते. श्री माताजींनी सांगितले की ज्या मर्सिडीज कारबद्दल वर्तमानपत्राच्या लेखात छापले होते ती कार काही वर्षांपूर्वी श्री माताजींनीच रोमच्या आश्रमास भेट दिली होती आणि हे ऐकताच प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. हे लोक अशा गुरूंच्या आहारी गेले आहेत की जे आपल्या शिष्यांकडून त्यांचे सर्वस्व हिसकावून घेतात. हा कार्यक्रम खूप मोठे यश घेऊन आला.

श्री माताजींनी स्पष्ट केले की शोधकांमधेही अनेक पातळीचे लोक आहे. त्यांचा उद्देश कदाचित कौटुंबिक स्वास्थ्य, पैसा व सत्ता मिळवणे असू शकेल. अशाप्रकारचे ध्येय असल्यामुळे साधकांना काहीच आनंद मिळू शकत नाही. ते फक्त दुःखच देतात. बुध्दीने कोणीही परमेश्वरास जाणू शकत नाही. त्याच्याकडे पोहोचण्यासाठी भक्ती हाच मार्ग आहे. कबीरांचे संगीत आणि चमत्कारांच्या विविध कथा श्री माताजींनी सहजयोग्यांना समजावून सांगितल्या.

.....12

"मी माझ्या आईला माझ्याबरोबर आणले आहे". हे असे ऐकताच त्यांच्यातील राग नष्ट झाला. श्री माताजी म्हणाल्या "त्यांच्या आईबद्दलचा आदर पहा. त्यांना तो बरोबर समजवा."

पोस्टर्स आणि जाहिरातीचे काम सुत्रबध्दरीतीने आणि व्यवस्थितपणे हाताळले गेले होते की ज्याप्रमाणे कुराणात तिच्या {आदिशक्तीच्या} आगमनाबद्दल सांगितले आहे. इस्लामीक देशात एवढया मोठया प्रमाणावर हे सर्व पाहण्याचा हापहिलाच मोठा धक्का होता.

प्रोग्रॅमला आलेल्या लोकांनी अगदी निष्पापपणे प्रश्न विचारले. त्यांची अशी समजूत होती की भारतात आलेले गुरु म्हणजे अगदी सनातनी आणि कठोर असतात. परंतू त्यांना ज वाटले त्याच्या अगदी विरुध्द श्री माताजी आहेत. छोटयाशा भाषणानंतर सर्वांना जागृती देण्यात आली.

27 तारखेला सकाळी जवळजवळ 50 सहजयोगी श्री बेगम पाशा पूजेला उपस्थित होते. सागराप्रमाणे आपण आपले हृदय कसे उघडले पाहिजे त्यातून प्रेमाच्या नदया कशा वहायला पाहिजेत याविषयी श्री माताजींनी भाषणात सांगितले. आपण स्वाभिमान बाळगला पाहिजे आणि दुस-यांचा आदर केला पाहिजे. आपण आपली विवेक बुध्दी वापरली पाहिजे आणि आपल्या मर्यादा पाळल्या पाहिजेत.

आपण आपले हृदय उघडले पाहिजे आणि तेथे श्री माताजींना स्थित केले पाहिजे. जे संकुचित मनाचे आहेत त्यांच्यात श्री माताजी नसतात. त्यामुळे आपण आपली हृदय इतकी मोठी केली पाहिजेत की ज्यायोगे आपण त्याच्यात श्री माताजींचे निस्सीम आणि अमर्याद प्रेम प्रस्थापित करु शकू.

इस्तंबुलमधील हॉटेल हिल्टनमधील कार्यक्रम मोठे यश घेऊन गेला. त्या कार्यक्रमास पत्रकार व शासकीय अधिकारी उपस्थित होते. स्वीस ग्रुपने संगीताचा कार्यक्रम सादर केला. जागृतीनंतर ब-याचशा शोधकांनी नियमितपणे येण्याचे आश्वासन दिले. नंतर आणखी कार्यक्रम घेण्यासाठी अकबर ग्रीसमधील ॲनी ही, अमेरीकन सहजयोगी हे तेथेच राहीले.

श्री माताजी तुर्की एअरलाईन्सने गेल्या आणि नम्र व तत्पर सेवेबद्दल त्या प्रसन्न होत्या. श्री माताजींनी सांगितले की भारतात जाताना इस्तंबुलाला मी थांबत जाईन आणि तुर्की एअर लाईन्सने परत जाईन.